# मेट्रो ३ : रुळांचे ५८ टक्के काम पूर्ण



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ भुयारी मार्गिकेदरम्यान रूळांचे ५८ टक्के काम पूर्ण झाले असून, आरे ते बीकेसी पहिला टप्प्याचे लोकार्पण डिसेंबर महिन्यात करण्यात येणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड अर्थात एमएमआरसीएलने मेट्रो ३ मार्गिकेच्या कामकाजाचा आढावा घेताना रूळांच्या कामाची माहिती दिली.

३३.५ किमी मार्गिकेच्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो मार्गिकेच्या संपूर्ण प्रकल्पाचे ५८ टक्के काम पूर्ण झाले आहे. मेट्रो ३ च्या आरे, सारीपूत नगर येथील कारशेडमध्ये प्रोटोटाइप ट्रेनच्या माध्यमातून चाचण्या सुरू आहेत. आरे कारशेडचे काम ५४ टक्के पूर्ण झाले असून, त्यामुळे मेट्रो ३च्या रूळ टाकण्याच्या कामाने वेग घेतला आहे. आरे मेट्रो स्थानक ते वरळी, चर्चगेट ते कफ परेड या पॅकेजमधील रूळ टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून, वरळी ते चर्चगेटदरम्यान रूळ टाकण्याचे काम सुरू आहे. एमएमआरसीएलने भुयारीकरणाचे काम पूर्ण केले आहे. सध्या मेट्रो स्थानके उभारून त्यातील सिव्हिल वर्क पूर्ण करण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. स्थानकांची उभारणी विविध पद्धतीने करताना प्रवाशांच्या सुविधांकडे लक्ष देण्यात आले आहे.